महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : दिगंबर गाडगीळ

- वर्ष – चौदावे
- अंक २ रा
- १ जानेवारी २०२४
- पाने – २४



मनोज बिंड

# क्षणचित्रे



३६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी
डॉ. सालिम अली यांच्या भव्य रांगोळीचे अनावरण करतांना मान्यवर.



महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे उद्घाटन रोपट्याला पाणी घालून करण्यात आले.
यावेळी उद्घाटक श्री. राजेंद्र केरकर, डॉ एरीक भरुचा यांची प्रमुख उपस्थिती



श्री अजितकुमार उर्फ पापा पाटील यांना संमेलनाध्यक्ष पदाचा कार्यभार
म.प. चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर व आयोजक संस्थेचे
श्री. शरद आपटे संस्थेचा ध्वज देऊन सोपवितांना



श्री. शरद आपटे यांचे पक्षिगान .. का? केव्हा? कोठे? या पुस्तकाचे प्रकाशन करतांना
श्री. राजेंद्र केरकर डॉ.जयंत वडतकर,डॉ.गजानन वाघ आणि लेखक श्री. शरद आपटे



संमेलनाच्या उद्धाटनप्रसंगी निसर्गकट्टा, अकोला तर्फे तयार केलेली
पक्षी विषयावरील दिनदर्शिकेचे प्रकाशन सहभागी पक्षीमीत्र व मान्यवरांच्या हस्ते झाले



सांगली जिल्हा पक्षी मार्गदर्शिका या पुस्तकाचे प्रकाशन संमेलनात करण्यात आले.
हे पुस्तक संमेलनात सहभागींना विनामूल्य देण्यात आले.




संमेलनाच्या समारोप प्रसंगी मंचावर उपस्थित प्रसिद्ध छायाचित्रकार
श्री. बैजू पाटील, प्रा. डॉ. निनाद शाह,  म.प. चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर,
प्रा. डॉ. गजानन वाघ, श्री. शरद आपटे, डॉ. नंदिनी पाटील इत्यादी मान्यवर



महाराष्ट्र पक्षिमित्र प्रमाणित व डॉ. अनिल माळी यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी
तयार केलेल्या पक्षी अभ्यासक्रमाची माहिती डॉ. अनिल माळी यांनी
संमेलनात दिली. याप्रसंगी  डॉ. माळी यांचे स्वागत करतांना प्रा. डॉ. निनाद शाह

## संपादक

**श्री.दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

## सहाय्यक संपादक

**श्री. किरण मोरे**,अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

**श्री. दिलीप विरखेडे**, वर्धा , मो. ७७७५८८३८६१

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | - | **डॉ. अनिल माळी**, नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | - | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | - | **श्री. दिलीप विरखडे**,वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | - | **श्री. अविनाश कुबल**,ठाणे<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | - | **कु. रूपाली मढवी**,मुंबई<br>**मो. ९८६९५५९९२२** |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## पक्षी सप्ताह




**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com


गेली कित्येक वर्ष १ ते ७ ऑक्टोबर हा जागतिक वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. त्यामुळे महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेने घोषित केलेला ५ ते १२ नोव्हेंबर हा पक्षी सप्ताह कितपत लोकप्रिय होतो ही धाकधूक होती. पण सुदैवाने ती शंका दूर झाली. पुढे संस्थेने शासकीय पातळीवर देखील तो साजरा व्हावा अशी विनंती केली. त्याला महाराष्ट्र सरकारने होकार दिला. तसे परिपत्रक निघाले. पण सरकारी पातळीवरचे सप्ताह कसे साजरे होतात हे डोळ्यासमोर होते. तो उपक्रम पार पाडला जातो हा अनुभव होता. पण सरकारने, खास करून वनखात्याने तो उत्साहाने साजरा केला. या सप्ताहात पक्षी निरीक्षणाबरोबरच चित्र प्रदर्शन, प्रकाशचित्र स्पर्धा, स्लाईड शो असे कार्यक्रम झाले.

वन्यजीव म्हणजे प्रामुख्याने वाघ बघणे हा कार्यक्रम लोकांच्या डोक्यात ठसला होता, त्याप्रमाणे तो साजरा झालाही. पण त्याचा परिणाम पक्षी सप्ताहावर झाला नाही. त्यामागे पुढील कारणे संभवतात - वन्यजीव पहायचे तर अभयारण्यात जावे लागते; केवळ मोटारमधून फिरावे लागते, मनाप्रमाणे फिरता येत नाही. खर्च परवडत नाही. पण पक्ष्यांचे तसे नाही. घरबसल्या पक्षी पाहता येतात. त्यांच्यासाठी दाणापाण्याची सोय करता येते. त्यातून बालपणापासून चिऊकाऊच्या गोष्टी ऐकल्यामुळे आम जनतेत पक्षिप्रेम रुजलेले असते, त्यामुळे असेल कदाचित पण पक्षीसप्ताहाला चांगले स्वरूप आले ही समाधानाची बाब आहे, हा उत्साह वाढतो आहे हे निश्चित. एवढेच नाही तर शहर पातळीवर होणाऱ्या संमेलनावरून दिसते आहे. त्यामुळे पक्षीसप्ताहाचा उद्देश सफल होणार अशी चिन्हे आहेत ही आनंदाची बाब आहे.

*****

मुखपृष्ठ :- Black Storck काळ्या मानेचा करकोचा - छायाचित्रकार- मनोज बिंड,अमरावती

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

यावर्षीचे ३६ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन सांगली येथील बर्ड साँग या संस्थेच्या यजमानपदाखाली नुकतेच २३-२४ डिसेंबर दरम्यान पार पडले. या संमेलनात राज्यभरातून सुमारे २०० पक्षिमित्र व स्थानिक विद्यार्थी व कार्यकर्ते मिळून संमेलनास भरघोस असा प्रतिसाद मिळाला. दोन दिवस चाललेल्या या संमेलनाचा मुख्य विषय पक्ष्यांची पिसे या विषयासह अनेक विषयांवर अभ्यासक व संशोधकांनी आपल्या सादरीकरणातून नावीन्यपूर्ण विषय मांडले. संमेलनात झालेल्या व्याख्यानामध्ये निमंत्रित केलेल्या वक्त्यांचे सादरीकरण व सहभागींची सादरीकरणे अशी भरगच्च मेजवानी होती. निमंत्रित वक्त्यांमध्ये पक्ष्यांची पिसे या विषयावर बोलण्यासाठी, भारतातील पहिल्या फेदर लायब्ररीच्या संस्थापक व नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजीकल सायन्सेस, बेंगळूरू येथील इशा मुन्शी यांचे सह नेचर कंझर्व्हेशन फाउंडेशनचे पक्षी व हॉर्नबिल संशोधक डॉ. रोहित नानिवडेकर, डॉ. प्रिती बंगाळ, कु. पूजा पवार तसेच आयसर येथील श्री. श्रेयस माणगावे यांचा समावेश होता. या संशोधकांच्या व्याख्यानांतून पक्षिमित्रांना पक्षी विषयावर देशभरात होत असलेल्या संशोधन व संवर्धनासाठी होत असलेल्या कार्याची माहिती मिळाली, तसेच या संशोधकांशी झालेल्या चर्चेतून अनेक शंकांचे निरसन सुद्धा झाले. संमेलनात विशेष निमंत्रितांमध्ये जागतिक ख्यातीचे प्रसिद्ध छायाचित्रकार श्री. बैजू पाटील तसेच सातारा येथील लेखक डॉ. संदीप श्रोत्री यांनी अनुक्रमे पक्षी फोटोग्राफी व गालापागोस बेटावरील पक्षी व उत्क्रांती असे महत्वपूर्ण विषय मांडले. याशिवाय सहभागी पक्षिमित्रांपैकी डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, डॉ. अनिल माळी, श्री शरद आपटे, डॉ. विनोद भागवत, डॉ. नंदिनी पाटील, डॉ. चेतना उगले, श्री. अनिल महाजन, प्रशांत कुंभार, चिन्मय गावंडे, हिमांशू लाड व निनाद गोसावी आदींनी आपल्या पक्षी अभ्यासावरील माहिती आपल्या व्याख्यानातून मांडली. एकूणच काय तर या व्यासपीठावरून मांडलेले विषय, नवीन पक्षी अभ्यासकांना दिशा देणारे व ज्ञानात भर टाकणारे ठरले. संमेलनाच्या आधीच्या दिवशी पक्ष्यांचे आवाज व गाणे या विषयावर एक दिवसाच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते. या परिषदेसाठी सुद्धा अभ्यासकांनी उत्स्फूर्त असा सहभाग नोंदविला. संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी प्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक डॉ. एरिक भरुचा, गोवा येथील पर्यावरणवादी श्री राजेंद्र केरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ वन्यजीव संवर्धक श्री. अजित उर्फ पापा पाटील यांची प्रकृती ठीक नसतानाही त्यांनी व्हिडीओच्या लिखित भाषणाच्या माध्यमातून मांडलेले विचार मार्गदर्शक ठरले. या संमेलनात श्री. शरद आपटे यांचे ''पक्षिगान, का? केव्हा? कोठे?'' या पक्ष्यांच्या आवाजाविषयी माहिती देणाऱ्या मराठीतील पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन सुद्धा झाले. हे पुस्तक पक्षी अभ्यासकांसाठी महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार आहे. या महत्त्वाच्या पुस्तकाशिवाय आणखी काही पुस्तकांचे प्रकाशन सुद्धा झाले.

या संमेलनाचे आयोजन सांगली येथील शांतीनिकेतन लोकविद्यापीठ परिसरात करण्यात आले होते. या शाळेचा प्रशस्त व नयनरम्य असा परिसर बघून व येथील सुविधा व विद्यार्थ्यांमधील शिस्त बघून सर्वच सहभागी अवाक् झाले होते. शाळा कशी असावी याचे ते उत्तम उदाहरण आहे. या शाळेचा संपूर्ण परिसर संमेलनासाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. या संस्थेच्या डॉ. नंदिनी पाटील ह्या संमेलनाच्या आयोजनात सुद्धा महत्वाच्या भूमिकेत असल्याने संमेलनात विद्यार्थ्यांचा सुद्धा सक्रीय सहभाग होता. त्यामुळेच हे संमेलन उत्कृष्ट ठरले असे म्हणावे लागेल.

दिवाळी पूर्वी ५ ते १२ नोव्हेंबर दरम्यान राज्यभर पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र पक्षिमित्रने सुरु केलेला हा पक्षी सप्ताह गेल्या २०२० पासून शासन स्तरावरून साजरा करण्यास मान्यता मिळाल्यापासून तो वन विभाग तसेच शाळा महाविद्यालयातून सुद्धा साजरा होऊ लागला. महाराष्ट्र पक्षिमित्र सभासदांनी व पक्षीमित्र सोबत स्थानिक पक्षी विषयक कार्य करणाऱ्या संस्थांनी या काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून स्व. डॉ. सालिम अली यांना आदरांजली वाहिली, तसेच आदरणीय मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिन साजरा केला.

महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे अमरावती येथे सुद्धा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दरवर्षी प्रमाणे अंध विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेले पक्षिनिरीक्षण हा कार्यक्रम विशेष ठरला. तसेच महाराष्ट्र पक्षीमित्र व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते. यामध्ये बिएनएचएस चे संशोधक डॉ. राजू कसंबे, डॉ. परवीन शेख, डॉ. सत्यासेल्वम, डॉ. सुजित नरवाडे व श्री. मृगांक प्रभू यांनी पक्ष्यांच्या विविध विषयांवर आपले विचार मांडले.

महाराष्ट्र पक्षीमित्रकडून पक्षी अभ्यासावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करावा अशी चर्चा किंवा मागणी बरेच दिवसापासून चालू होती. त्याची सुरुवात व उद्‌घाटन सांगली येथील पक्षीमित्र संमेलनात झाले. महाराष्ट्र पक्षीमित्रचे जेष्ठ सभासद डॉ. अनिल माळी यांनी पुढाकार घेऊन हा अभ्यासक्रम विकसित केला असून महाराष्ट्र पक्षीमित्रकडून मान्यताप्राप्त हा अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम ८,९ वी च्या शालेय विद्यार्थ्यांसाठी निर्माण केला गेला असून इच्छुक शाळेच्या मुख्याध्यापक व प्रकल्प मार्गदर्शक शिक्षकांच्या सहकार्याने शालेय स्तरावर राबविला जाणार आहे. या अभ्यासक्रमाबाबतची माहिती डॉ. अनिल माळी यांनी संमेलनात दिली. त्यानंतर हा अभ्यासक्रम राज्यभर पसरलेल्या पक्षिमित्रांच्या सहकार्याने अनेक शाळेंपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. संमेलनात उपस्थित असणाऱ्यांनी हा अभ्यासक्रम आपापल्या गावात राबविण्याचा मानस यावेळी व्यक्त केला.

यावर्षीपासून महाराष्ट्र पक्षीमित्र स्व. प्रकाश गोळे महाराष्ट्र पक्षीमित्र शिष्यवृत्ती सुरु करण्यात आली असून या शिष्यवृत्तीची घोषणा या संमेलनात करण्यात आली. या फेलोशिपसाठी यावर्षी श्री उदय वझे, अकोला यांचेकडून रु. ११०००/– इतका निधी प्राप्त झाला आहे. याशिवाय या संमेलनातील सहभागींसाठी श्री. उदय वझे यांनी दुर्बीण भेट योजना प्रायोजित केली होती. या अंतर्गत सर्व सहभागींमधून चिठ्ठीद्वारे दुर्बीण विजेता निवडण्यात आला आणि आणि विजेत्यास दुर्बीण भेट देण्यात आली. संमेलनाचे यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल आमचे जेष्ठ सभासद श्री. शरद आपटे, शांतीनिकेतन लोकविद्यापीठाच्या डॉ. नंदिनी पाटील तसेच ''बर्ड साँग'' संस्थेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच संमेलनासाठी विविध माध्यमातून सहकार्य करणाऱ्या तमाम सांगलीकरांचे मनपूर्वक अभिनंदन आणि आभार. पक्षिमित्र संमेलनाची ही पालखी महाराष्ट्रातील पक्षिमित्रांच्या खांद्यावरून अशीच वाटचाल करीत राहील यात शंकाच नाही. सांगली येथून ही पालखी पुढील वर्षी अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव या ठिकाणी पोहोचणार असून शेवगाव येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज हे पुढील ३७ व्या संमेलनाचे आयोजक असणार आहेत.

**मिळून सारे जण । करू द्विजगण रक्षण ।।**

*****



**सांगली येथील ३६ व्या संमेलनाच्या समारोप प्रसंगी काढलेले समूह छायाचित्र**

# पक्षी निरीक्षणातून मला झालेले आत्मपरीक्षण..!



**आशिष बंड जैन**
पक्षी निरीक्षक, कारंजा (लाड)
9011887800

पक्षी निरीक्षण करणे माझा छंद आहे. आपल्या सभोवती असणारे किंवा दिसणारे विविध प्रकारच्या पक्ष्यांचे अवलोकन करणे, त्यांच्या हालचाली टिपणे, त्यांचे रंगरूप बघणे, त्यांचा जीवनक्रम न्याहाळणे, त्यांच्या सामजिक जीवनाचा अभ्यास करणे मला आवडते. त्यांना बघताना मला जो आनंद व समाधान मिळते, त्यातून जी ऊर्जा प्राप्त होते त्यामुळे मी प्रोत्साहित होतो. एरवी त्याकडे दुर्लक्ष करून आपल्या स्वार्थी जीवनात रमणारे आपण कधी काळी विरंगुळा म्हणून पक्ष्यांचे फोटो व्हिडिओ बघून आनंद मिळवतो. परंतु त्यांना प्रत्यक्षात बघून जो आत्मिक आनंद मिळतो त्याची गोडी अत्यंत वेगळी आहे. जर का तुम्ही सातत्याने पक्षी निरीक्षण करीत राहिले तर त्यातून निश्चितच तुम्हाला आत्मपरीक्षणसुद्धा होऊ शकते, असे मला वाटते. पक्षी जगत हे या पृथ्वीवरील जैवविविधतेच्या साखळीतील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. पक्ष्यांशिवाय पर्यावरण पूर्णत्वास जात नाही. त्यांचे निसर्गातील योगदान अत्यंत गरजेचे आहे. या सर्व बाबी जरी तांत्रिक असल्या तरी वरकरणी त्यांचे निरिक्षण करूनसुद्धा आपण आपल्या जीवनात बरेच काही बदल घडवून आपले जीवन सुखी व समाधानी करू शकतो.

पक्ष्यांचे आयुष्य जेमतेम असते. त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा थोडक्यात अभ्यास केला तर त्यात खाण्या पिण्याच्या व्यतिरिक्त बऱ्याच गोष्टी अनुकरणीय आहेत, खाणे पिणे हे जरी जीवनात सर्वांना आवश्यक असले तरी त्या व्यतिरिक्त आदर्श ठरावा असा जीवनक्रम सुद्धा असणे गरजेचे असते. फक्त रोज आपले पोट भरावे व रिकामे करावे याला जीवनात स्थान नाही, जरी ती आवश्यक व नित्य क्रिया आहे. तथापि, आपल्या जीवनातून इतरांना प्रेरणा मिळेल असे जीवन आदर्श ठरतं असते. आणि हे पक्ष्यांच्या जीवनक्रमातून सुद्धा स्पष्ट होते.

**आहार**

पक्ष्यांचा आहार हा प्रत्येक पक्ष्यांच्या प्रजातीनुसार ठरलेला आहे. बहुतांश पक्षी आपला नित्य आहार आपल्या वेळेवरच करतात. तसेच निशाचर पक्षी सोडले तर ते रात्री सुद्धा आहार घेत नाहीत. जिथे त्यांचे अन्न उपलब्ध आहे ती जागा शोधून आहार घेतात. यातून त्यांची शोध वृत्ती, जिज्ञासू वृत्ती आपल्याला बघायला मिळते. आपला आहार, भक्ष्य ते स्वतः परिश्रम घेऊन मिळवतात. दुसऱ्याच्या तोंडातील घास हिसकावून बहुतांश कधी घेताना दिसत नाहीत. त्यांचा मोठा थवा जरी असला तरी समूहाने आपापले खातील. समूहाने चरताना सावध राहतील, जरा सुद्धा धोका वाटल्यास समूहाने उडून तेथून पसार होतील. निर्णय घेताना हा सामूहिक निर्णय राहतो. सूर्यास्तानंतर सायंकाळी सर्वांसोबत परत येऊन आपापल्या ठिकाणी समूहाने किंवा जोडीने निद्रिस्त होतील. यावरून त्यांचा एकोपा घेण्यासारखा आहे.

**घरटी बांधणे व पिलांचे संगोपन**

पक्षी आपल्या विणीच्या हंगामात आपले घरटे बनवितात. काही पक्षी नर मादी मिळून घरटे करतात तर काही नर किंवा मादी एकेकटे घरटे तयार करतात. स्वतःचे घर स्वतः बनवितात. यावरून त्यांची स्वावलंबी वृत्ती जाणवते. विविध साहित्यातून ती ही कलाकृती घडवतात. अतिशय सुरक्षित ठिकाणी ते बांधतात. घरटे शत्रूंपासून सुरक्षित राहील याची खबरदारी घेतात. त्यातून त्यांची जबाबदार वृत्ती प्रदर्शित होते. यानंतर घरट्यात अंडी घालून ती उबवली जातात. त्यानंतर पिलांचे संगोपन दोघे मिळून करू लागतात. आपल्या पाल्याची जबाबदारी अतिशय संवेदनशीलपणे ते घेत असतात. त्याला खाऊ घालणे, घरट्यातून साफ सफाई, पिल्लांची सुरक्षितता, त्यांना उडण्याचे धडे देणे इत्यादी बाबी ते मोठे होईपर्यंत सातत्याने दोघेही नर मादी करीत असतात. जोपर्यंत ते स्वतंत्रपणे उडू शकत नाहीत, स्वतःचे अन्न स्वतः शोधू शकत नाहीत तो पर्यंत त्यांची पालकत्वाची संपूर्ण जबाबदारी नर मादी घेताना दिसतात. ही त्यांच्यातील संगोपन प्रवृत्ती अतिशय प्रशंसनीय वाटते.

मनुष्य हा कुठल्याही परिस्थितीत स्वतःला जुळवून घेतो. ऊन वारा पाऊस पूर दुष्काळ इत्यादी संकटांपासून स्वतःला

वाचवतो. परंतु पक्षी असे करू शकत नाहीत. तात्पुरत्या प्रासंगिक किंवा आकस्मिक संकटाशी दोन हात करतील, पण दूरगामी प्रतिकूल परिस्थिती ते सहन करू शकत नाहीत. त्यासाठी ते एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर करतात. प्रतिकुलतेतून अनुकूलतेने प्रवास करणे ही एक प्रकारे अनुकरणीय गोष्ट त्यांच्यात बघायला मिळते. आहे त्याच परिस्थितीत जीवन जगून, प्रतिकूल परिस्थितीचे भांडवल न करता, आपला अनुकूल मार्ग निवडून आपला जीवन प्रवास सुरू ठेवतात.

**अपरिग्रह**

माझ्या सर्वात आवडता सद्‌गुण पक्ष्यांमध्ये आढळत असेल तर तो म्हणजे अपरिग्रह. कुठल्याच व्यर्थ गोष्टींचा संग्रह करताना पक्षी दिसणार नाहीत. अन्न रोज शोधून खातील. घरट्यात कधी संग्रह दिसणार नाही. ज्या वेळेस पिल्ले होतील त्या काही दिवस आधी घरटे बांधतील. पिल्ले मोठे झाल्यावर कितीही सुबकतेने बांधलेले घरटे असले तरी त्याचा यत्किंचितही मोह न ठेवता ते सोडून देतील. इतकेच काय तर आपली पिल्ले मोठी झाल्यावर, सर्व दृष्टीने सक्षम झाल्यावर त्यांना सुद्धा सोडून देतील. पक्ष्यांची ही असंग्राह्य वृत्ती अतिशय वाखणण्याजोगी व अनुकरणीय वाटते. जीवनाचा कुठलाच पसारा न वाढवता अतिशय सुंदर व निर्मोह पद्धतीने जीवन जगणे हे पक्ष्यांकडून शिकण्यासारखे आहे.

**सामाजिक जाणीव**

काही पक्षी अतिशय सामाजिक जाणिवेतून आपले जीवन जगत असतात. एकमेकाना सहकार्य करतात. मिळून मिसळून राहतात. शत्रूंची एकमेकांना जाणीव करून देतात. आहार घेताना सर्व मिळून चरतात. एकाच ठिकाणी, एकाच झाडावर, एकाच अधिवासात आपल्याला अनेक पक्षी राहताना दिसतील. एकच परिसरात विविध पक्षी चरताना, उडताना, बसताना आपल्याला बघायला मिळतील. कुठलाच प्रजातीचा भेदभाव न करता गुण्यागोविंदाने किलबिल करीत आनंदाने एकत्र दिसतील. कधी कुणावर संकट आल्यास एकत्र येऊन , त्याला सतर्क करून त्याचा नायनाट करतील. सर्व पक्षी विविधतेतून एकता प्रदर्शित करतांना दिसतील. क्वचित् भांडतील ही परंतु कायम शत्रुत्व त्यांचे कधी दिसणार नाही.

**आनंद**

पक्षी निरंतर आनंदाने गात असतो. त्यांच्या विविध मंजुळ आवाजाने सर्वांना आकर्षित करतो. आपल्या जोडीदाराला साथ देताना इतरांना सुद्धा आपल्याकडे बघण्यास भाग पाडतो. प्रत्येक पक्षी विविधतेने नटलेला आहे. रंग, रूप, आवाज, आकार सर्व काही विलोभनीय आहे. त्याचे रूप बघताना तो सर्वांना नकळत आनंद देतो. त्याच्या विविध प्रकारच्या स्वरांनी, इतरांना प्रकृतीचा विविध अंदाज देतो.

त्याच्या विविध हालचाली, लकबी, नृत्य, त्याचे उडणे सर्वांना आनंददायी ठरते. स्वतःच्या अनंदासोबत इतरांना सुद्धा तो आनंद देतो.

**निसर्ग संवर्धन**

पक्ष्यांच्या माध्यमातून अप्रत्यक्षपणे निसर्ग वृद्धिंगत होत असतो. अनेक प्रकारच्या झाडांची लागवड ही नकळत पक्ष्यांमार्फत होत असते. त्यांनी खाल्लेल्या विविध फळांच्या बिया त्यांच्या विष्ठेमधून प्रसारित होतात. त्यातून परिसरात नवीन झाडे उत्पन्न होतात. जंगल वाढीस मदत होते. हे खूप मोठे निसर्ग संवर्धनाचे कार्य पक्षी नित्य करीत असतात. अनेक फुलांच्या परागांचे प्राशन पक्षी करतात. या फुलावरून त्या फुलावर जाताना सुद्धा झाडांची नवीन उत्पत्ती होत असते. अनेक प्रकारचे घातक कीटक, माश्या, पतंग इत्यादी पक्ष्यांचे अन्न आहे. त्यातून सुद्धा निसर्ग चक्राचा समतोल पक्षी राखतात.

पक्ष्यांचे निरीक्षण, अभ्यास केल्यावर जे काही पक्ष्यांमधील गुणविशेष मला दिसले त्याचा सकारात्मक प्रभाव माझ्यावर पडला व मला पक्षी निरीक्षणासोबत आत्मपरीक्षण करण्याची गरज वाटली. आज मनुष्य आपल्या जलद गतीच्या स्वार्थी जीवनात बरेच काही गमावून बसला आहे. आपल्या या नित्य दैनंदिनीतून काही वेळ जरी त्याने संयम ठेवून पक्षी निरीक्षणास दिला तर त्याच्या जीवनाचे सार्थक होईल.

*****

# असे पाहुणे येती



**राहुल श्रीकृष्ण वंजारी**

सोलापूर

9960347554

सोलापूर हे मध्य भारतातील एक माळरान व गवताळ प्रदेश म्हणून प्रसिद्ध आहे. अशाच धरतींवर या ठिकाणी अनेक वेग-वेगळ्या अधिवासात अनेक प्रकारचे माळावरचे, तलावावरचे, नदीकाठाचे, काटेरी झुडपामधील अनेक पक्षी दिसून येतात. अशा एक अधिवासात दिसून आलेल्या एक पाहुण्या पक्षी झालेली नवीन नोंदीची निरीक्षणे.

दिनांक १६ नोव्हेंबर २०२३ रोजी पक्षीनिरीक्षण करताना दुपारी ३ च्या सुमारास थोबडे वस्ती, जुना देगाव नाका, जवळच असणाऱ्या आडव्या नळाजवळ गर्द झाडा-झुडपाजवळ मलबार शिळ कस्तुर *(Myophonus horsfieldii)* हा पक्षी दिसून आला. या ठिकाणी अनेक प्रकारची झाडे व झुडपे आहेत. त्यामध्ये बाभूळ, सुबाभूळ, कडूलिंब, बोर, मुख्यतः ह्या ठिकाणी सर्वात जास्त प्रमाणात वेडी बाभूळ या झाडाचे प्रमाण जास्त असून उंच आणि मोठ्या प्रमाणात पसरलेले आहेत. त्याचबरोबर या ठिकाणी फळांमध्ये चिंच, बदाम, चिक्कू, पेरू, तुती अशी अनेक झाडे आहेत. झाडाच्या सावलीत ५ -६ गाय म्हशींचा गोठा तयार झालेला आहे. याच्या मलमूत्राचा मार्ग हा एक बाजूने वाहत असतो. शेजारी अनेक घरे असून लोकांची वर्दळ सतत असते. अशाच झाडी-झुडपांमधून तो दिवसभर एकडून तिकडून ये-जा करायचा.

मलबार कस्तुर हा पक्षी दिसायला कबुतर एवढा असून पंखावर, खांद्यावर, मानेवर, चमकदार अशी गडद निळ्या रंगाची छटा आहे, त्यामुळे तो लगेच ओळखू आला. हा पक्षी जमिनीलगत असणाऱ्या पाळापाचोळामध्ये अन्न शोधून खाताना दिसत होता. कधी कधी अधूनमधून शीळ घालत होता.

दिनांक १७ नोव्हेंबर२०२३ रोजी सकाळी निरीक्षणादरम्यान ६ वाजता हा कोथिंबीरीच्या शेतात अन्न शोधताना दिसून येत होता. जसं-जसं उन्हाची तीव्रता वाढायची तसं-तसं एक एक करत अनेक पक्षी जमा होऊन याच्याबरोबर अन्नग्रहण करत होते. त्यामध्ये दयाळ, राखी वटवट्या, चष्मेवाला, सुभग, बुलबुल, हिरवा वटवट्या, पायमोजा वटवट्या दिसायचे. काही वेळेनंतर उन्हाची तीव्रता वाढत जात होती तशी त्या उन्हाला शेकायला येणारा सरडा येताच त्यावर हमला करण्यासाठी आलेला भारद्वाज जेव्हा येतो तेव्हा सर्व पक्षांची तारांबळ होते. अशाच वेळेचा फायदा घेण्यासाठी मुंगूस आणि घर मांजर येते तेव्हा तर सारे पक्षी गोंधळून निघून जातात.

सोलापूर हे दख्खनच्या पठारावरील एक मुरमाड-माळरान, दगड-धोंड्याचा, काटेरी झुडपांचे विरळ असे जंगल असणारे अधिवास म्हणून ओळखले जाते. अशा अधिवासात हा पक्षी जेव्हा दिसू लागतो, तेव्हा असा अंदाज निर्माण होतो की मलबार शीळ कस्तुर हा पक्षी डोंगरमाथा, दरी-खोऱ्यामध्ये गर्द सदाहरित वनामध्ये आढळून येतो आणि पश्चिम घाटामध्ये देशनिष्ठ असणारा पक्षी हा हिवाळ्यामध्ये सोलापुरात दिसून येतो.

याचबरोबर या पक्षांसारखे नील कस्तुर, नारंगी डोक्याचा कस्तुर, निळ्या डोक्याचा कस्तुर, काळा कस्तुर, यांच्या कुळातील व कुटुंबातील अनेक पक्षी दर हिवाळ्यामध्ये सोलापुरातील जंगलामध्ये दिसून येतात. कदाचित हा पक्षी हिवाळ्यामध्ये पश्चिमेकडून पूर्वेकडे स्थलांतर करत असावा असा आमचा अंदाज आहे.



# अथातो विहंगजिज्ञासा.. पक्ष्यांवर बोलू काही...

**डॉ. सचिन शरच्चंद्र चिंगरे**

धुळे

7499613912



पक्षी आणि मानवाचे नाते सनातन आहे. लहानग्या बाळाचे पहिले घास आई, 'हा घास चिऊचा, हा घास काऊचा, म्हणूनच भरवायची. थोडे मोठे झाले की आजी गोष्ट सांगायची ती पण 'चिऊचे घर होते मेणाचे आणि काऊचे घर होते शेणाचे' अशीच. मग कुठे रामायणात जटायू भेटायचा, तर कुठे पुराणकथात पक्षीराज गरुड. (आता टीव्ही, मोबाईलमुळे हे प्रमाण शहरी भागात तरी कमी झालेय. दुर्दैवाने डोरेमॉन वा अन्य कल्पित परदेशी कार्टून्स नी, तिथेही पक्षांच्या जागेवर अतिक्रमण केले आहे.) पुढे मोठेपणी संस्कृत अभ्यास केला तर वाल्मिकी रामायण काव्याचा पहिला श्लोक ' उपनिषद...' यात प्रणयमग्न क्रौंच पक्षीयुगुलाची शोकांतिका भेटते. जरा अध्यात्माची आवड असेल तर पैल तो गे काऊ कोकताहे' असे ज्ञानेश्वर माउलींचे मधुर काव्यवचन भेटते. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हे संत तुकाराम वचन तर आपण नेहमी पाहतो, पण त्यापुढे 'पक्षीही सुस्वरे आळविती', हेही आवर्जून सांगणारे रसिक कवी तुकोबा भेटतात.

यौवनात किंवा नंतरही चित्रपट गीतांची आवड असेल तर पपीहा, कोयल, मयूर, कबूतर या शब्दातून कितीतरी पक्षी भेटतातच. मराठी भावगीतांची आवड असेल तर या 'चिमण्यांनो परत फिरा' सारखे आर्त गीत एकदा ऐकून कितीतरी वेळ उंच आकाशात घिरट्या घालणाऱ्या पक्षांसारखे मनात रुंजी घालते. 'अशी पाखरे येती' सुद्धा सर्वश्रुतच आहे. माझी एक हिंदी कविता येथे देण्याचा मोह आवरत नाही. माणूस आणि पक्षी यांचे तरल भावनिक नाते यातून दाखवण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**चिड़ीयां**

बनाने दीजिए चिड़ियों को
घर में कहीं पर घोसला
इंन्सान इंन्सानियत में जरा
घटने दीजिए फासला ।
चिड़ियां गर आयी चहकते
खुशियां आयेगी महकते
देख भरोसा जालिम इंन्सानपर
तब बढ़ा लीजिए हौसला ।
कुदरत की फनकार चिड़ियां
सृजन की झंकार चिड़ियां
यंत्र सा जीना या चिड़ियों सा
जरा सोचकर लीजिए फैसला ।
चिड़ियों को दो चुगने दाना
नन्हीं जान नन्हा सा खाना
आश्रय अन्न महापुण्य अर्जन
व्रत यात्रा मान लीजिए कोसला ।

शास्त्रीयदृष्टया पक्षी हे आपल्या सभोवतालच्या परिसंस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. पिंपळासार 'या महावृक्षाची नैसर्गिक लागवड केवळ पक्ष्यांच्या विष्ठेतून होते. अनेक पक्षी हानिकारक कीटक खाऊन पर्यावरण संतुलन 'जीवो जीवस्य जीवनम् ' पद्धतीने नियंत्रित ठेवतात.

माणसाने कृत्रिम घड्याळ तर तयार केले, पण खगोलीय निसर्गाचा तासकाटा, ऋतूंचा मिनीट काटा आणि मानवी शरीरातील आंतरक्रिया संवेदना यांचा सेकंद काटा यांनी निर्मित जैविक घड्याळ-बायोलॉजिकल क्लॉक - मात्र लोभी, आधाशी माणसाने मोडीत काढले. ठराविक दिवसात दूर अतिशीत सायबेरियातून उबदार भारतात, हजारो किलोमीटर उडून येणारे व ठराविक काळाने परत जाणारे पक्षी या नैसर्गिक घड्याळाची सुखद आठवण करून देतात. माणसाने निसर्गावर विजय मिळवू इच्छिणारा महत्त्वाकांक्षी प्रतिस्पर्धी किंवा शत्रू म्हणून न जगता निसर्गपुत्र, त्याचा घटक म्हणून जगणे किती छान, आनंददायी व आरोग्यकारक आहे, हेच पक्षी आपल्याला शिकवत नाहीत का?

घुबडासारखा एखादा अपवाद सोडला तर बहुतांश पक्षी सकाळी लवकर, ब्रह्ममुहूर्तावर जागे होतात आणि जणू त्यांच्या मधुर वाणीने निसर्ग देवतेची स्तोत्रे म्हणतात. ब्रह्ममुहूर्ताला पर्यायी नाव खग, विहंग मुहूर्त असायला हरकत नाही. जरा अध्यात्म किंवा

माझ्यासारखा काव्यात्मक विचार केला, तर पक्ष्यांकडून कितीतरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. जैन पंथाची महत्त्वाची तत्वे – अहिंसा (अन्न मिळवणे वगळता अन्य कारणासाठी जीवहत्या न करणे) सत्य, अस्तेय (चोरी न करणे), ब्रह्मचर्य (केवळ ऋतुकाली व अपत्य प्राप्तीसाठी समागम), अपरिग्रह (जीवनावश्यक वस्तूंचीही साठवणूक न करणे) ही नक्कीच रानावनात तप करणाऱ्या जैन मुनींनी पक्षिनिरीक्षणातून घेतली असतील, असा माझा ठाम समज आहे.

शेतीसाठी पक्षी काही वेळा नुकसानकारक ठरत असले तरी त्यापेक्षा खरे तर त्यांच्यापासून फायदेच जास्त आहेत. कीटक भक्षण करून, या झाडावरून त्या झाडावर जाताना परागण करून पक्षी परिसंस्थेला मदतच करतात. खरे पाहता गहू, तांदूळ, ज्वारी बाजरी आदी धान्यांचे आकारच असे आहेत की निसर्गाने ते प्रामुख्याने पक्ष्यांसाठी, चोचीने उचलता येतील असे आहेत, असेही काही निसर्गवादी मित्रांचे मत आहे. म्हणजे धान्यावर पक्ष्यांचाही हक्क आहेच!

कावळा, गिधाड यासारखे कुरुप, अप्रिय मानले गेलेले पक्षीही मृत प्राणी खाऊन परिसंस्थेत स्वच्छतेचे काम करतात. पण आता दुर्दैवाने तेही दुर्मीळ होत चाललेत.

आजकाल अनेक पक्षीनिरिक्षक, पक्षिमित्र व त्यांच्या संस्था दिसतात. डॉ सालीम अली सारख्या श्रेष्ठ लोकांमुळे भारतात या विषयाची जागृती झाली. उशीराने का होईना, 'देर आये दुरुस्त आये' पद्धतीने आधुनिक माणूस पुन्हा पक्ष्यांचा गांभीर्याने विचार करू लागलाय, ही आनंदाची बाब आहे. मानवामधले रसिक, सहृदय माणूसपण टिकवाचे असेल, तर पक्षांशी नाते तोडून चालणार नाही. शेवटी, ज्ञानेश्वर महाराज म्हणतात पद्धतीने, 'भूतां परस्परें जडो मैत्र जीवांचे...' म्हणून पक्षी निरीक्षक / मित्र संघटनांचे माध्यमातून जनजागृती होऊन हे सुंदर, लोभसवाणे मैत्र टिकून राहील अशी आशा व्यक्त करतो.

****

***महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे दिला जाणाऱ्या पुरस्कारांची क्षणचित्रे***



महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे दिला जाणारा पक्षी जनजागृती पुरस्कार स्वीकारतांना श्री. अमोल सावंत अकोला



महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे दिला जाणारा पक्षी संशोधन पुरस्कार डॉ. शिरीष मंची यांना जाहीर झाला होता, त्यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारतांना डॉ. सुधाकर कुऱ्हाडे



होप संस्था ठाणे आणि महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे दिला जाणारा उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार स्वीकारतांना श्री. सौरभ अनिल महाजन, वरणगाव, जि. जळगाव



होप संस्था ठाणे आणि महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे दिला जाणारा उदयोन्मुख पक्षी निरीक्षक पुरस्कार स्वीकारतांना चि. अर्णव अमरेंद्र पटवर्धन, डोंबिवली जि. ठाणे

# शोधाची जननी....



**सौ. विदुला केदार कुलकर्णी**
पक्षी अभ्यासक आणि पक्षी छायाचित्रकार
पुणे, महाराष्ट्र

जेव्हा तुम्ही तुमच्या प्रियजनांसोबत प्रवास करता तेव्हा तो नक्कीच हवाहवासा वाटतो. 'पक्षी निरीक्षण' हा मुख्य हेतू डोळ्यासमोर ठेवून केलेली ही माझी पहिलीच सहल होती. आम्ही आमच्यासोबत एक पक्षीतज्ज्ञ पण घेतले होते. हिरवा शालू परिधान केलेली ती वसुंधरा फारच सुंदर दिसत होती. भर उन्हाच्या तडाख्यात देखील आमची पायी सुरू असलेली भटकंती सुखकर होती.

ह्या पक्षी निरीक्षणाच्या आधी मी ज्या सहली पार पाडल्या, त्यात मला फक्त कावळा, चिमणी, कबुतर, पोपट, मैना एवढेच पक्षी माहिती होते. पण ह्या पक्षी निरीक्षणाच्या सहलीमुळे मला एका वेगळ्याच जगाची ओळख झाली, ज्याला आपण पक्ष्यांचे नंदनवन म्हणू शकतो. पक्षी तज्ज्ञांनी मला शिकवले की, पक्ष्यांकडे कोणत्या नजरेने बघितले पाहिजे, त्यांचे निरीक्षण कसे केले पाहिजे. पक्ष्यांच्या रंगछटा, त्यांचे आकार, त्यांच्या चोचींचे वेगळेपण, त्यांचे आवाज व गाणी गाण्याची तऱ्हा ह्या मी एका जाणकाराच्या नजरेतून समजून घेत होते.

नुकताच सूर्योदय झाला आणि ते पक्ष्यांचे नंदनवन विविध आवाजांनी साद घालू लागले. पक्षी फारच सक्रिय होते आणि जणू ते त्यांच्या सर्व अवयवांचे व्यायाम करून तंदुरुस्त राहण्याचा मंत्र आम्हाला सांगत होते. त्यांची ती पाण्यात डुबकी मारून केलेली अंघोळ, पंखांचे साफ करणे (प्रिनिंग), कधी चक्क लहान मुलांसारखे मातीत लोळणे (डस्ट बाथ), कधी नुसतंच पंख पसरवून नदीच्या काठावर ते वाळवत बसणे हे सगळेच माझ्यासाठी मजेशीर आणि कुतूहल जागृत करणारं होतं. शिळकरी कस्तुर (मलबार व्हिसलिंग थ्रश) च्या गाण्याचा सूर ऐकून मला तर एखाद्या तरुण मुलाने कॉलेज कट्ट्यावर बसून त्याला आवडणाऱ्या मुलीसाठी वाजवलेली जी शिट्टी असते त्याचीच आठवण करून दिली. तो तरुण कसा एखादी मुलगी आवडण्यासाठी अनेक प्रयत्न / उद्योग करत राहतो तसा हा पक्षी आपली सुंदर नादमधुर शीळ घालून त्याच्या प्रियेला साद घालत होता आणि एकीकडे ती जागा त्याची आहे हे पण बजावून सांगत होता.

तासन्तास मी त्या झाडांमध्ये, फांद्यांमधून, पानापानांमधून माझी नजर फिरवत होते. पक्षी शोधण्याचा तो ध्यास लागला होता. माझी वाटचाल त्या हिरव्यागार जगातून चालूच होती. माझ्यासाठी ही प्रक्रियाच एखाद्या मेडिटेशनसारखी होती. संयम ठेवणे हा एकच मंत्र इथे प्रकर्षाने लागू पडतो. जरा कुठे फांदी हलली, हालचाल जाणवली की आशेचा किरण जागृत होई. माझा नुकताच घेतलेला डिजिटल कॅमेरा प्रयोगासाठी सज्ज होई. पक्ष्यांचे दर्शन होण्यासाठी व चांगले छायाचित्र काढता यावे ह्यासाठी मी माझी सर्व ज्ञानेंद्रिये चांगलीच कामाला लावली होती. अखेर ती वेळ आली आणि माझा संयम जणू शोधाची जननी बनला.

स्वर्गीय नर्तक (पॅराडाईज फ्लायकॅचर, मलबारी कवड्या धनेश (मलबार ग्रे हॉर्नबिल), पाचू होला (एमरल्ड डव्ह), बदाम ठिपक्यांचा सुतार (हार्ट स्पॉटेड वुडपीकर), छोटा सोनपाठी सुतार (ब्लॅक-रॅम्फ गोल्डन बक), पांढऱ्या गालाचा कुटूरगा (व्हाईट चिक बार्बेट), चष्मेवाला (ओरिएंटल व्हाईट आय), शामा (व्हाईट रम्पड शामा), सोनपाकळी पर्णपक्षी (गोल्डन फ्रण्टेड लीफ बर्ड), पांढऱ्या पुठ्ठ्याची मनोली (व्हाईट रम्पड मुनिया), काळ्या मानेची आकाशी माशिमार (ब्लॅकनेप ब्ल्यू मोनार्च), ठिपकेवाला सातभाई (पफ थ्रोटेड बॅब्लर), शिटीमार रानभाई (ब्राउन चीक फुलवेटा), नारिंगी डोक्याचा कस्तुर (ऑरेंज हेडेड थ्रश), टिकेलची निळी माशिमार (टिकल ब्लु फ्लाय कॅचर ), पिवळ्या पायाची हरोळी (यलो फुटेड पिजन), समुद्री घार (ब्राह्मणी काईट), पांढरा धोबी (व्हाईट व्यागटेल), पिवळा धोबी (वेस्टर्न यलो व्यागटेल), पांढऱ्या मानेचा करकोचा (वुली नेक स्टोर्क), तिरंदाज (ओरिएंटल डार्टर) अशा असंख्य पक्ष्यांच्या प्रजाती एकामागून एक दिसत गेल्या.

एकाच वेळी मी सतर्क, संयमी, उत्साही आणि मधून मधून आराम अशा संमिश्र भावनांचा मजेशीर खेळ मनापासून खेळत

आणि अनुभवत होते. अशा अनेक संमिश्र भावनांचा समूह मला एकामागून एक पक्षी शोधायला शिकवत होता. गमतीचा भाग म्हणजे जसे पोलीस चोराचा पाठलाग करतात तशी मी पण पक्ष्यांचा पाठलाग नजरेने करण्यात गुंतून गेले होते. पुढे काय होईल आणि अचानक काय समोर दिसेल हे माहीत नव्हते.

पक्षी निरीक्षण आणि पक्ष्यांचे फोटो काढणारी काही तज्ज्ञ मंडळी पण माझ्यासोबत होती. पक्षी दिसला रे दिसला की ते पटापट पक्ष्याची नावे सांगून फोटो काढून रिकामे होत होते आणि माझी मात्र तारांबळ उडाली होती. पक्ष्याचे नाव लक्षात ठेवायचे, त्याचा फोटो काढायचा, कॅमेऱ्याचे सेटिंग पण ॲडजस्ट करत राहायचे आणि शिवाय पक्ष्यांचे निरीक्षण पण करायचे..... अरे बापरे..... फारच अवघड होते. त्यांचे व्यावसायिक कॅमेरे फटाफट फोटो काढत होते आणि मी माझ्या मूलभूत डिजिटल कॅमेऱ्यावर एखादा फोटो काढू शकत होते. वातावरण ढगाळ झाले. फोटो काढताना कॅमेऱ्याचे सेटिंग कसे आणि कोणते ठेवायचे काही सुचेना आणि जमेना. पण जिद्द सोडली नाही. माझा छोटासा कॅमेरा (जो माझ्यासाठी खूप मोठा आणि मोलाचा होता) घेऊन मी त्या छायाचित्रकारांमध्ये घुसून घुसून सर्व पक्ष्यांचे फोटो काढण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला. शेवटी त्या छायाचित्रकारांनाच माझी दया आली असावी कारण नंतर त्यांनी सगळ्यांनी मिळून मलाच सुरवातीला सगळ्यांच्या पुढे चालायची किंवा उभे राहायची मुभा दिली, जेणेकरून मला सर्व नीट अभ्यासता येईल, निरीक्षण करता येईल आणि फोटो पण नीट घेता येतील. माझ्याकडे मोठी लेन्स नसल्यामुळे त्यांनी ती अडचण समजून घेऊन मला खूपच सहकार्य केले. पक्षी निरीक्षण आणि फोटोग्राफी ह्या क्षेत्रात नवीन असणाऱ्या लोकांना कसे समजून घ्यायचे ह्याचे उत्तम उदाहरण मी ह्या सर्व मंडळींकडून शिकले.

जो काही माझा गोंधळ चालू होता तरी माझे लक्ष मात्र पक्ष्यांचे वेगवेगळे आवाज ऐकण्यात गुंतले होते. ते पक्षी गाणं म्हणतायत का, ओरडतायत का त्यांच्या साथीदाराला बोलावतायत हे मी डोकं खाऊन खाऊन माझ्यासोबत असलेल्या पक्षी तज्ज्ञाला विचारत होते. आपल्या आईने मारलेली हाक कोणत्या कारणासाठी आहे हे जसे तिच्या आवाजावरून त्या मुलाला बरोबर कळते तसाच काहीसा हा प्रकार पक्ष्यांच्या साद घालण्यामध्ये आहे असे मला वाटले. पक्ष्यांचे गाणे आणि हाक यात फरक असतो हे तेव्हा मला कळले. अनेक पक्षी आपापल्या कौशल्यांची प्रात्यक्षिके सादर करण्यात रममाण झाले होते. पक्ष्यांची ती सुरेल जुगलबंदी मला एखाद्या संगीत रजनी महोत्सवाची आठवण करून देत होती; मंत्रमुग्ध करत होती.

'गणेशगुडी' हे त्या जागेचे नाव जिथे मी हा सगळा अनुभव घेतला. दांडेलीतील हे ठिकाण म्हणजे पक्षी प्रेमींसाठी एक पर्वणीच आहे. निसर्गाचं भरभरून वाण ह्या ठिकाणाला मिळालेले आहे. एक संपूर्ण नवीन जग जे माझ्या आजूबाजूला नेहमीच उपस्थित होते पण माझ्या उदासीन डोळ्यांना ते दिसले नव्हते. अशा एका नवीन जगाची सुंदर ओळख झाल्याने मला स्वर्ग दोन बोटे राहिला होता. मी शोधलेल्या ह्या जगाची ओळख हवीहवीशी वाटणारी झाली आणि पुढे तो नाद वाढतच गेला. माझी पुढची सुट्टी कधी घ्यायची याचा विचार करण्याऐवजी मी असे जीवन जगले पाहिजे की ज्यापासून मला दूर पळून जाण्याची आवश्यकता भासणार नाही असा धडा ह्या सहलीतून, प्रवासातून मी नक्कीच शिकले. निसर्गाने आपल्या ओंजळीत दिलेले हे माप आपण सर्वांनी जपायचा सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे असे मला मनापासून वाटते.

****



महाराष्ट्र पक्षिमित्र व WECS अमरावती यांचे तर्फे आणि अमरावती वनविभाग यांच्या सहकार्याने अमरावती येथील बांबू गार्डनमध्ये **"एक प्रयास : दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. पवन राठोड, श्री. प्रशांत निकम, प्रा. सफल पाटील, प्रा. अनंत वडतकर, प्रा. गजेंद्रसिंग पचलोरे व डॉ.जयंत वडतकर यांनी विद्यार्थ्यांना पक्षी निरीक्षण घडवून आणले. कार्यक्रमाचे समन्वयक श्री. सौरभ जवंजाळ यांनी कार्यक्रमासाठी अथक प्रयत्न केले.

# उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्रांचे चौथे संमेलन धुळे येथे प्रथमच संपन्न.



**डॉ. विनोद भागवत**
अध्यक्ष, निसर्गवेध संस्था, धुळे
(धुळे जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना)
9422238523

पक्षी संरक्षण व पक्षी संवर्धन एक चळवळ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र पक्षीमित्र संघटन अंतर्गत, धुळे शहरातील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या कै. कर्म. डॉ. पां. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग आणि निसर्गवेध संस्था, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्रांचे संमेलन नुकतेच झाले. या संमेलनाची मुख्य संकल्पना माळरान पक्षीसंवर्धन ही होती. पक्षी निरीक्षण, पक्ष्यांचे प्रजनन, वर्तणूक, स्थलांतर, पक्षी गणना, पक्ष्यांविषयी असलेले समज व गैरसमज, अंधश्रद्धा, मानवी जीवनातील पक्ष्यांचे महत्त्व यांसारख्या अनेक गोष्टींवर संमेलनात उहापोह झाला. परिषद-वजा-संमेलनात विविध राज्यातील २२८ संशोधक, अभ्यासक विद्यार्थी व पक्षिप्रेमिंनी सहभाग नोंदविला. पंजाब, आंध्र प्रदेश, राजस्थान, दिल्ली व राज्यातील सर्व जिल्ह्यातील संशोधक सहभागी झाले होते.

२१ ऑक्टोबर २०२३ शनिवार पासून दोन दिवसीय ४थे उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनास प्रारंभ झाला. या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर श्री शिवाजी शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, आमदार कुणाल पाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत (अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, उ.म.वि. जळगाव), श्री. अनिल महाजन (संमेलनाध्यक्ष), डॉ. पी. एम. व्यवहारे, डॉ. विनोद भागवत (अध्यक्ष, निसर्गवेध संस्था), प्राचार्य डॉ. पी. एस. लोहार, प्राचार्य डॉ. एम. पी. पाटील, प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. डि. व्ही. अहिरराव, परिषदेचे समन्वयक डॉ. पी. एम. महाले उपस्थित होते. निसर्गाच्या विविध घटकांचे महत्त्व, संस्थेचे ध्येय, उद्दिष्टे व महाविद्यालयाचा परिचय तसेच चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी केले. आमदार कुणाल पाटील यांनी देशातील विविध राज्यातील निसर्ग अभ्यासक व पक्षिमित्र यांनी एकत्र चर्चा करून सभोवतालच्या निसर्गाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी "Discovery of Flights' या संमेलन स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. तसेच धुळे जिल्ह्यातील पक्षी Birds of Dhule District या डॉ. विनोद भागवत यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. 'उत्तर महाराष्ट्र पक्षीसूची' या ई-पुस्तकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

पंढरपुरला दरवर्षी जसे श्रद्धेने वारकरी येतात, तसेच हतनूर जलाशयावर दरवर्षी हिवाळ्यात हजारोंच्या संख्येने विदेशी पक्षी येतात. याच विषयाच्या अनुषंगाने 'हतनूरचे वारकरी' या शीर्षकाने अरविंद गजानन जोशी दिग्दर्शित आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव आणि चातक निसर्ग संवर्धन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने निर्मित वृत्तचित्रपटाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध पक्षितज्ज्ञ श्री. अनिल महाजन यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा वृत्तचित्रपट, पक्षी आणि धार्मिक भावनांच्या संगमाचा सुंदर कलाविष्कार आहे.

परिषद-वजा-संमेलनात प्राचार्य डॉ. पी. एस. लोहार, प्राध्यापक डॉ. ए. टी. कळसे, प्रा. डॉ. अनिल परदेशी, डॉ. पी. एम. व्यवहारे, प्रा. डॉ. डी. एल. फंड यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. प्रियंका शिसोदे, डॉ. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले डॉ. प्रवीण महाले यांनी आभार मानले. संमेलनस्थळी पक्षी छायाचित्र प्रदर्शन भरवले होते. त्यात स्थानिक, स्थलांतरित व परदेशी पक्ष्यांची माहिती देण्यात आली. तसेच दुर्मीळ होत चाललेले, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या पक्ष्यांच्या माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले.

संमेलनाच्या उद्घाटननंतर डॉ. सुजित नरवाडे, सहाय्यक संचालक, बी. एन. एच. एस. (Coordinator, Great Indian Bustard and Lesser Florican Program, BNHS, Mumbai) यांचे बीज भाषण झाले. त्यांनी भारतात माळढोक आणि तणमोर या पक्ष्यांविषयी सद्यस्थिती अहवाल मांडला. BNHS द्वारे माळढोक व तणमोर संवर्धनासाठी केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांविषयी माहिती दिली. माळढोक संवर्धनाकरिता आज मोठे कार्य करणे

गरजेचे आहे. यासाठी सर्वांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, यावर जोर देऊन कृतीशील कार्यक्रम करण्याचे आवश्यकता आहे असे सांगितले.

सकाळच्या सत्रात चिखली (बुलढाणा) येथील डॉ. विजयश्री हेमके, यांनी पक्ष्यांच्या चोची विषयी शास्त्रीयदृष्ट्या माहिती आणि पक्ष्यांच्या चोचींची विविधता व त्यांच्या कार्याची मनोरंजक माहिती सादर केली. तसेच नडख पुणे येथील शास्त्रज्ञ-ब डॉ. सचिन पाटील यांनी 'पक्षी संवर्धना' बाबत व्याख्यान दिले. या परिषदेत विविध राज्यातील संशोधकांनी ६१ भित्तीपत्रक (Poster) व ४५ मौखिक (Oral) शोधनिबंध सादर केले. सायंकाळी उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र समितीच्या सदस्यांची बैठक झाली. यात, हतनूर धरण क्षेत्राला 'रामसर स्थळ दर्जा' मिळावा याकरिता विशेष प्रयत्न करावा, तसेच धुळे जिल्ह्यातील सोनवद तलाव क्षेत्र आणि माळराने सुरक्षित राहाण्यासाठी प्रयत्न करावे असे ठरले.

दुसऱ्या दिवशी रविवारी दिनांक २२ ऑक्टोबर २०२३ रोजी, धुळे शहरापासून, पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या, गोंदूर तलाव परिसरात पक्षी निरीक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या पक्षी निरीक्षणात संमेलनातील ६४ संमेलनार्थींनी सहभाग घेतला. दोन तास चाललेल्या पक्षी निरीक्षणात एकूण ४६ पक्षी प्रजातींची नोंद करण्यात आली. त्यानंतर त्या ठिकाणी, चांडक फॉर्म येथे, चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सहभागी पक्षिमित्रांनी पाहिलेले पक्षी, त्यांचे महत्त्व, संवर्धन, संरक्षण अशा विविध विषयांवर चर्चा झाली. त्यानंतर सकाळच्या सत्रात उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतील सदस्यांचे सादरीकरण झाले. या वेळी, प्रथम श्री. अभय उजागरे (जळगाव) यांनी पक्षी संवर्धना विषयी आजच्या परिस्थितीत किती धोके, संकटे आहेत, या विषयी माहिती मांडली. सामान्य पक्षी निरीक्षक, सामान्य जनता, यांचा पक्षी संवर्धना विषयी किती उपयोग होईल? कसा करता येईल? यावर विचार मंथन करण्यात आले. त्यानंतर डॉ. अनिल माळी (नाशिक) यांनी 'नाशिक जिल्ह्यातील माळरानाची सद्यस्थिती' याविषयी माहिती दिली, तसेच नाशिक जिल्ह्यात आढळणाऱ्या माळरानावरील पक्षी प्रजातींना कोणते व किती प्रकारचे धोके आहेत, यावर सविस्तर चर्चा केली. त्यानंतर डॉ. विनोद भागवत (धुळे) यांनी 'माळरान पक्षी संपदा व संवर्धन' या विषयावर धुळे जिल्ह्यातील माळरानांची स्थिती व त्यावर आढळणारे पक्षी आणि त्यांना असलेले धोके या विषयावर सादरीकरण केले. त्यानंतर डॉ. प्रशांत वाघ यांनी 'घुबड एक रहस्यमय पक्षी शेतकऱ्यांचा मित्र' या शीर्षकाखाली सादरीकरण केले. त्यांनी घुबडांविषयी सर्वसामान्यांना माहीत नसलेली अद्भुत माहिती दृकश्राव्य माध्यमातून मांडली. डॉ. निनाद शहा यांनी 'पक्षी: जैविक कीटक नियंत्रण' या विषयावर सादरीकरण केले. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांनी 'अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ल्यातील पक्षी वैभव' याविषयी सादरीकरण केले व रंजक माहिती सांगितली.

संमेलनाच्या समारोप प्रसंगी एस. एस. व्ही. पी.एस.चे उपाध्यक्ष तथा क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे अधिसभा अध्यक्ष डॉ. एस. टी. पाटील, जयहिंद संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. प्रमोद पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ. के. एम. बोरसे, अहमदनगर येथील ज्येष्ठपक्षी अभ्यासक प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, डॉ. विनोद भागवत, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डि. व्ही. आहिरराव, राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक एम. पी. महाले, सुनील पाटील, उपस्थित होते. समारोप कार्यक्रमात विविध स्पर्धेत मिळविलेल्या परितोषिकांचे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. भित्तीपत्रक सादरीकरणात प्रथम पारितोषिक डॉ. सुनील रत्नपारखी, द्वितीय अनिकेत करपे व तृतीय पारितोषिक दुर्गेश फुलवाडे यानी प्राप्त केले. मौखिक सादरीकरणात प्रथम डॉ. संदीप बडगुजर, द्वितीय डॉ. अनिल माळी, तृतीय पारितोषिक अंकिता प्रसाद यांनी प्राप्त केले. डॉ. चेतन शर्मा, डॉ. मुकेश पाटील यांना 'यंग सायंटिस्ट', तर प्रा. दीपक गायकवाड, डॉ. सिद्धार्थ सोनवणे, डॉ. तरुण शेख यांना 'बेस्ट टीचर' डॉ. योगेश अहिरराव, डॉ. मनीषा पाटील यांना 'निसर्ग मित्र' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थी निबंधलेखन स्पर्धेत प्रथम गटात प्रथम कु. अंजली यशवंत बिलकुले (१०वी), द्वितीय कु. हर्षदा राजमल मोरे (१०वी) व तृतीय कु. चैतन्य रविंद्र शिरसाठ (९वी) तर द्वितीय गटात प्रथम कु. अंजली भगवान तवर (११वी), द्वितीय कु. वैष्णवी राजेंद्र पाटील (११वी) व तृतीय कु. अमृता विकास वायसे (११वी ) यांना बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

पक्षी हे अन्नसाखळीतील महत्त्वाचे अविभाज्य घटक असून त्यांचे मानवी जीवनात फार महत्त्व आहे शेतातील नैसर्गिक

कीड नियंत्रण यासारखे अनेक प्रकारे उपयोग सिद्ध झाले आहेत पण सध्या रासायनिक खते व कीटकनाशकांचा अति वापर, गौणखणात उत्खनन, पर्यटन, वाढती लोकसंख्या, पक्षांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होणे, अमाप वृक्ष व जंगलतोड, मोबाईल टॉवर, माळरानांचे घटते क्षेत्र यांसारख्या ओरबाडणाऱ्या वृत्तीमुळे पक्षांची संख्या लक्षणीयरीत्या घटत आहे. पक्ष्यांच्या बऱ्याच प्रजाती नामशेष झाल्या असून, अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणून पक्षी संरक्षण, संवर्धन होणे काळाची गरज आहे. असा सूर दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत उमटला. परिषद-वजा-संमेलनाचे यशस्वी आयोजनात श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या कै. कर्म. पां. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागातील सर्व अध्यापक, कर्मचारी आणि निसर्गवेध संस्थेचे श्री प्रभाकर वाघ (कार्याध्यक्ष), श्री बी. ए. पाटील (उपाध्यक्ष), श्री राकेश जाधव, श्री संदीप बागल आणि इतर सदस्यांचे परिश्रम फार मोलाचे ठरले. सर्व सहभागी पक्षिप्रेमिंनी संमेलनात सहभाग घेतल्यामुळे विशेष आनंद अनुभवला आणि पुढील संमेलनाची आतुरतेने वाट पाहणार अशी इच्छा व्यक्त केली.




****

## डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांचा 'पर्यावरण गौरव' पुरस्काराने सन्मान

महाराष्ट्र पक्षिमित्र चे संघटक, ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. सुधाकर कुऱ्हाडे (अहमदनगर) यांचा एनव्हायरॉनमेंटल क्लब ऑफ इंडिया अणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे वतीने 'पर्यावरण गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पुणे येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंग प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. विकास आणि पर्यावरण यांचा प्रवास सोबतीने होणे आवश्यक असून शाश्वत प्रयत्नांशिवाय पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न फोल ठरतील असे मत त्यांनी व्यक्त केले. पर्यावरण गौरव पुरस्कार प्राप्त डॉ. सुधाकर कुऱ्हाडे हे महाराष्ट्र पक्षिमित्रचे ज्येष्ठ सभासद् असून पक्षी, कीटक, प्राणी या विषयी त्यांचे सत्तर संशोधन निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित झाले आहेत. जळगांव येथे संपन्न झालेल्या २४ व्या महाराष्ट्र पक्षिमिय संमेलनाचे आणि बारीपाडा (धुळे) येथील दुसऱ्या उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. कुऱ्हाडे यांनी भूषविले आहे. त्यांचे निसर्ग पर्यावरण पक्षी संवर्धन या विषयांवर सुमारे २५० लेख विविध वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झाले आहेत.



**महाराष्ट्र पक्षीमित्र चे संघटक, ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. सुधाकर कुऱ्हाडे (अहमदनगर) यांचा एनव्हॉयरॉनमेंटल क्लब ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे वतीने 'पर्यावरण गौरव' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.**

# महाराष्ट्र पक्षिमित्र व्याख्यानमालिका आढावा



**डॉ. चेतना उगले**
व्याख्यानमालिका समन्वयक
महाराष्ट्र पक्षीमित्र

महाराष्ट्रात पक्षी विषयक जनजागृती करण्यात महाराष्ट्र पक्षीमित्र अग्रेसर आहे आणि आता फक्त महाराष्ट्र पर्यंत मर्यादित न राहता संपूर्ण देशभर पक्षांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी जनजागृतीचे अविरत कार्य चालू आहे. महाराष्ट्रात सुरु झालेला पक्षीसप्ताह आज राष्ट्रीय स्तरावर बर्ड काउन्ट इंडिया यांच्या सहयोगाने महाराष्ट्र पक्षीमित्र संघटन देशभर उत्साहाने साजरा करत आहे. दिनांक ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२३ साजरा झालेल्या पक्षीसप्ताह मध्ये यावर्षी बॉंबे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या सहकार्याने महाराष्ट्र पक्षीमित्र संघटने द्वारे पक्षीविषयक ऑनलाईन व्याख्यानमालिका घेण्यात आली. यामध्ये बीएनएचएसचे सहा.संचालक डॉ. राजू कसंबे यांनी श्री मारुती चितमपल्ली व डॉ. सालीम अली ह्यांचे पक्षी शास्त्रातील योगदान यावर सादरीकरण केले. बीएनएचएसचे सहा. संचालक डॉ. सुजित नरवडे यांनी संकटग्रस्त माळढोक पक्ष्याची सद्यस्थिती आणि संवर्धनची गरज यावर माहिती दिली तर सहा. संचालक डॉ. पी. सत्यसेल्वम यांनी फ्लायवे संवर्धनासाठी पक्षी निरीक्षकांचे योगदान यावर सादरीकरण केले. युवा संशोधक डॉ. परवीन शेख आणि श्री. मृगांक प्रभू यांनी अनुक्रमे चंबळच्या खोऱ्यातील पक्षी संवर्धन आणि पक्ष्यांचे स्थलांतर व अभ्यासाचे तंत्र यावर सादरीकरण केले. बीएनएचएस मधील पक्षीतज्ज्ञ आणि संशोधकांनी या व्याख्यान मालिकेतून पक्षीमित्रांना आणि पक्षीअभ्यासकांना शास्त्रीय माहिती देऊन त्यांच्या ज्ञानात भर टाकली. पाच दिवस चाललेल्या या व्याख्यानमालिकेला पक्षीमित्रांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महाराष्ट्रासह गुजरात, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक येथूनही पक्षीमित्रांनी उपस्थिती दर्शविली.

मागील वर्षी चालू झालेल्या पक्षीविषयक व्याख्यान मालिका भाग ३ (२०२३) ची डिसेंबर मध्ये सांगता झाली. ऑनलाईन चाललेल्या या व्याख्यान मालिकेमध्ये प्रत्येक महिन्याच्या दुसरा आणि चौथा बुधवारला विविध सादरीकरण करण्यात आले. ऑक्टोबर महिन्यातील दुसऱ्या बुधवारला, बॉंबे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे सहायक संचालक डॉ. राजू कसंबे यांनी पक्षी वर्तन या विषयावर सादरीकरण दिले. पक्षांच्या जन्मापासून ते प्रजनन आणि नंतर पालकत्व याचे सचित्र वर्णन आणि माहितीपूर्ण माहिती डॉ. कसंबे यांनी दिली. व्हिज्युअल्स अँड मल्टिमीडियाच्या वापरामुळे सर्व पक्षीमित्रांना संपूर्ण सादरीकरणाचा उद्देश स्पष्ट झाला आणि संवर्धनाच्या प्रयत्नांसाठी काय करता येईल याची दिशा भेटली. याच महिन्यातील दुसरे व्याख्यान, बर्ड काउन्ट इंडियाचे महाराष्ट्र प्रादेशिक समन्वयक श्री. रमेश शेणाई यांनी ट्रिप रिपोर्ट वर 'चला आकर्षक इ-बर्ड ट्रिप रिपोर्ट बनवूया!' माहितीपूर्ण सादरीकरण केले. इ-बर्ड या पक्षांच्या आंतरराष्ट्रीय नोंद असलेल्या वेबसाईट वर केलेल्या पक्षी निरीक्षणाच्या नोंदी ट्रिप रिपोर्ट मध्ये कश्या समाविष्ट करायच्या, त्यांचे वर्णन आणि माहिती कशी टाकायची याचे थेट प्रात्यक्षिक दिले त्यामुळे त्यातील बारकावे पक्षी मित्रांना अधिक चांगल्या प्रकारे शिकता आले.

नोव्हेंबर महिन्यातील दुसरा बुधवार हा पक्षीसप्ताहचा भाग झाला आणि सर्व पक्षी मित्रांना बीएनएचएस मधील सहा. डायरेक्टर डॉ. सुजित नरवडे यांचे संकटग्रस्त माळढोक पक्ष्याची सद्य स्थिती आणि संवर्धनाची गरज यावर माहिती ऐकण्याची संधी मिळाली. विलक्षण आकर्षक असणारा माळढोक आणि त्याची अत्यल्प होत जाणारी संख्या धक्का देणारी आहे, त्यामुळे त्याच्या संवर्धनासाठी असणाऱ्या गरजा आणि उपाय यावर अर्थपूर्ण माहिती डॉ. नरवडे यांनी दिली. यानंतर चौथ्या बुधवारला, अमरावती येथील वन्यजीव छायाचित्रकार श्री. मनोज बिंड यांनी पक्षिनिरीक्षणात छायाचित्रांचे महत्व यावर सखोल माहिती दिली. नवीन पक्षाचा शोध अथवा त्यांच्या वर्तनातील वेगळेपण किंवा मग स्थलांतरीत पक्षांच्या नोंदी यामध्ये छायाचित्रण हा एक महत्वाचा पुरावा कसा राहील याबद्दल विस्तृत माहिती दिली. यानिमित्त त्यांनी काढलेल्या आणि आंतराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त त्यांच्या छायाचित्र बघण्याची संधीही पक्षी मित्रांना मिळाली. डिसेंबर मध्ये कोकणातील तरुण पक्षी संशोधक

# राज्यभरात पक्षी सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा

भारतीय पक्षीविश्व व पक्षीअभ्यासशास्त्रास जागतिक स्तरावर पोहोचवणारे डॉ. सालिम अली व महाराष्ट्रातील तमाम पक्षीनिरीक्षकांसाठी कायम आदरस्थानी असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्व आदरणीय मारुती चितमपल्ली या दोन्ही उत्तुंग व्यक्तींचा महाराष्ट्रातील पक्षीविश्वाशी खूप जवळचा संबंध असून त्यांनी रचलेल्या पायावरच आज महाराष्ट्रातील पक्षिमित्र वाटचाल करीत असतात. मारुती चितमपल्ली यांना त्यांचे जन्मदिनी शुभेच्छा देण्याकरिता व डॉ. सालिम अली यांना आदरांजली देण्यासाठी महाराष्ट्र पक्षिमित्र संघटने तर्फे ०५ नोव्हेंबर या आ.मारूती चितमपल्ली यांचे जन्मदिनापासुन ते १२ नोव्हेंबर या डॉ. सालिम अली यांचे जयंती पर्यंत चा आठवडा पक्षीसप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे गेल्या सहा वर्षापासून साजरा केला जाणारा पक्षी सप्ताह मागील २०२० पासून शासन स्तरावरून सुद्धा साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राज्यात शासकीय विभाग, शैक्षणिक आणि वन विभाग आणि पक्षिमित्र यांचे तर्फे पक्षी सप्ताहास मोठ्या उत्साहात साजरा होतो.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही संपूर्ण महाराष्ट्र विविध ठिकाणी पक्षीसप्ताह उत्स्फुर्तपणे साजरा करण्यात आला. विविध संस्था, शासकीय विभाग, शैक्षणिक आणि वन विभाग आणि पक्षिमित्र यांनी आपला सहभाग नोंदविला. अमरावती जिल्हा मध्ये मागील वर्षांपासून सुरु केलेला अभिनव उपक्रम एक प्रयास: दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण यावर्षीही आकर्षणाचे केंद्र ठरला. महाराष्ट्र पक्षिमित्र अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांच्या मार्गदर्शनात जिल्हा समन्वयक श्री. सौरभ जवंजाळ सोबत वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती आणि महाराष्ट्र वनविभाग अमरावती यांनी पुढाकार घेऊन डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय अमरावती येथील (दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी) पक्षीनिरीक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. पक्षांचा आवाज आणि आकार यावरून पक्षांविषयी अधिक माहिती विद्यार्थांनी करून घेतली. यासाठी डॉ. पवन राठोड, श्री. प्रशांत निकम आणि सहकारी यांचे सहकार्य लाभले. पक्षिमित्र अंकाचे संपादक श्री. किरण मोरे, वेक्स संस्थेचे सभासद, सहायक वनसंरक्षक ज्योती पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांची उपस्थितीत वडाळी बांबू गार्डन येथे उद्घाटन तथा पक्षीनिरीक्षण घेण्यात आले.

यवतमाळ जिल्हामध्ये पक्षीसप्ताह उत्साहात साजरा झाला. जिल्ह्यातील तिन्ही विभागात डॉ. चेतना उगले सहा. प्राध्यापिका इंदिरा महाविद्यालय कळंब व जिल्हा समन्वक व श्री. डी. घोडेकर यांनी यवतमाळ विभागामध्ये, श्री.डी.जी. पाईकराव जिल्हा समन्वक यांनी पुसद विभाग तर पांढरकवडा विभाग मध्ये डॉ. डी. तेलगोटे व डॉ. सी. कासार यांनी पक्षी निरीक्षण आणि व्याख्यान यांचे आयोजन केले. यवतमाळ जिल्हा वन विभाग यांच्या सहकार्याने पैनगंगा अभयारण्य, जाम तलाव, खटेश्वर तलाव येथे पक्षी निरीक्षण झाले. तर शासकीय विभागामधून नगर पंचायत कळंब आणि चिंतामणी देवस्थान यांच्या सहकार्याने डॉ. चेतना उगले यांच्या मार्गदर्शनात कळंब येथील स्थानीय लोकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी भव्य पक्षी छायाचित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. तसेच शाळा आणि महाविद्यालय मध्ये पक्षी निरीक्षण आणि व्याखाने घेण्यात आली, ज्यात विद्यार्थांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

ठाणे जिल्हा मध्ये जिल्हा समन्वक श्री. अविनाश भगत, सोबत प्रवीण विशे, नरेंद्र भिवंडीकर यांच्या मार्गदर्शनात जंगलहाईक टूर्स यांच्या सहकार्याने अलिबाग समुद्रकिनारे, भांडुप पंपिंग स्टेशन आणि गांधारी खाडी येथे पक्षीनिरीक्षण व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. तसेच बिर्ला कॉलेज आणि वीर जिजामाता उद्यान येथे स्थानीय सहकार्याने पक्षीविषयक सादरीकरण व व्याख्यान घेण्यात आले. पक्षी सप्ताहाचा समारोप आणि दिपावलीच्या निमित्ताने लोकमत, मुंबई मधील वृत्तपत्र प्रतिनिधी श्री. महेश घोराळे यांनी मुंबई शहरातील गव्हाणी घुबड वर विशेष बातमी प्रसिद्ध केली.


बीड जिल्ह्यामध्ये समन्वयक श्री. हेमंत धानोरकर (भालेराव), प्रा अभिजीत लोहिया, डॉ. शुभदा लोहिया, नागनाथ तोंडारे यांनी अंबाजोगाई वनपरिक्षेत्रात विविध पाणवठा, मुरंबी, जोगाईवाडी, खोपरनाथ चनई तलाव आणि नागनाथ मंदिर परिसर येथे पक्षीनिरीक्षण केले. तर जळगाव जिल्ह्यामध्ये श्री.अश्विन पाटील यांच्या मार्गदर्शनात उडान पक्षिमित्र संस्थेच्या सहकार्याने अमळनेर परिसरातील पणवठ्यांवर पक्षीनिरीक्षण झाले. शाळेत स्थानीय वनविभाग आणि संस्था यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी पक्षी

श्री. प्रतीक मोरे यांनी धनेश पक्षी संरक्षण आणि संवर्धनासाठी त्यांनी चालू केलेला प्रयत्न सर्व पक्षी मित्रांना सांगितले. छोट्या गावातून आणि लोकसहभागातून आपण कश्याप्रकारे जंगलाचा शेतकरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धनेश पक्षाला संरक्षण देऊ शकतो याचा सचित्र त्यांचा प्रवास बघता आला.

डिसेंबर मध्ये सांगता झालेल्या व्याख्यानमालिका भाग ३ ची माहिती चिरकाल संग्रही राहावी या उद्देशाने सदर व्याख्यानमालिकेचे सर्व व्याख्याने विडिओ रूपात महाराष्ट्र पक्षीमित्र नावाच्या युट्युब चॅनेल वर उपलब्ध आहे. या ऑनलाईन व्याख्यानालिकेला महाराष्ट्र पक्षीमित्र अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांचे सतत मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. व्याख्यानमालिकेच्या यशस्वीतेसाठी श्री. किरण मोरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या कलात्मक दृष्टीतून व्याख्यानाचे माहितीपत्रक, युट्यूब चे शीर्षकचित्र अधिक प्रभावी होत आहे. व्याख्यानमालिकेला मिळणारा सभासदांचा आणि पक्षीमित्रांचा उत्स्फुर्त प्रतिसाद असाच कायम राहील हि आशा करते. आणि येणाऱ्या नवीन वर्षांमध्ये नवीन विषय आणि संशोधनात्मक चर्चा पुढे आणण्यासाठी आमचा प्रयत्न सतत चालू राहील.

****

## आपल्या माहितीला उजाळा – भाग १०

| अ.क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १. | गटात न बसणारा पक्षी ओळखा.<br>१) वारकरी २) कमळपक्षी ३) पाणलावा ४) सोनचिखल्या | हा पक्षी पाणकोंबड्याच्या कुटुंबातील आहे. |
| २. | छोटी फटाकडी (Little Crake) या पक्ष्याचे वैज्ञानिक नाव काय? | आकाराने इतर कोंबड्यापेक्षा लहान. |
| ३. | दुसऱ्या विश्वयुद्धातील तीव्र शिकारीमुळे ही फटाकडी लुप्त झाली. | हा पक्षी प्रशांत महासागरातील एका बेटावर आढळत होता. |
| ४. | पाणकोंबडी, नाम्या आणि फटाकडे यांचे पक्षीकुटुंब कोणते? | सुमारे ३३०००००० वर्षापूर्वी यांचे विभाजन झाले. |
| ५. | Rails : A Guide to Rails, Crakes, Gallinules and Coots of the World या ग्रंथाचे लेखक कोण? | ही मार्गदर्शिका २०१० साली प्रकाशित झाली. |
| ६. | २०१६ साली असाममध्ये आढळलेली पाणकोंबडी कोणती? | दक्षिण आशियातील प्रथम नोंद |
| ७. | २०२१ साली दक्षिण प्रशांत महासागरातील बेटावर पाणकोंबडीचे अवशेष सापडले त्या बेटाचे नाव काय? | ही प्रजाती Gallirallus astolfoi पहिल्यांदाच नोंदविली गेली. |
| ८. | भारतात पाणकोंबड्याच्या (Rallidae कुटुंबात) किती प्रजाती नोंदविल्या आहेत? | बहुतेक प्रजाती लाजऱ्या स्वभावाच्या आहेत. |
| ९ | ............ हा पक्षी पायाच्या बोटाला असणाऱ्या वल्ह्याच्या मदतीने पाण्यात विहरतो पण ते बदक नाही. | महाराष्ट्रात सर्वत्र आढळतो. |
| १०. | चित्रातील शास्त्रज्ञ ओळखा  | पाणकोंबडी या पक्षिवर्गाचे तज्ज्ञ. |

निरीक्षणाचे आयोजन करण्यात आले, ज्यात विद्यर्थानी उत्स्फुर्त सहभाग घेतला. नाशिक जिल्ह्यामध्ये नेचर क्लब ऑफ नाशिक आणि नांदुरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात डॉ. सलीम अली यांच्या आठवनींना उजाळा देण्यासाठी अनोखा उपक्रम पार पडला.

अकोला जिल्हातील दै. नवराष्ट्रच्या अकोला आवृत्तीमध्ये पक्षी सप्ताहा निमित्ताने वृत्तपत्र प्रतिनिधी श्री. विलास देशमुख यांनी संपूर्ण आठवडाभर संकटग्रस्त पक्षी ही वृत मालिका करून जनजागृती केली. ५ ते १२ नोव्हेंबर दरम्यान प्रकाशित झालेल्या विविध पक्ष्यांवरील बातम्यासाठी डॉ. राजू कसंबे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. गजानन वाघ, डॉ. सुजित नरवडे आणि श्री. मुकुंद धुर्वे यांनी विशेष माहिती उपलब्ध करून दिली. जिल्हा समन्वयक डॉ. मिलिंद शिरभाते यांनी निसर्ग कट्टा आणि श्री. अमोल सावंत, श्री मनोज लेखनार, श्री संतोष सुरडकर डॉ. हरीश मालपाणी, डॉ. अमृता शिरभाते आणि श्री. विलास देशमुख यांच्या सहकार्याने अटल वन, नियतक क्षेत्र लोणी येथे पक्षीनिरीक्षण केले. सोबतच विविध महाविद्यालयांमध्ये स्थानिक पक्षांवर रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. पक्षी सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र पक्षीमित्र विदर्भ समन्वयक अमरावती विभाग श्री. अमोल सावंत आणि निसर्ग कट्टा संस्थेद्वारे किलबिलाट या ई-मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

वाशिम जिल्ह्यात पक्षीमित्र व जिल्हा समन्वयक श्री. मिलिंद सावदेकर यांनी वत्सगुल्म जैवविविधता संवर्धन संस्था, श्री. पुरुषोत्तम इंगळे, श्री. निलेश सरनाईक आणि पक्षीमित्रांच्या सहकार्याने एकबुर्जी लघु पाटबंधारे प्रकल्प परिसरात पक्षीनिरिक्षणाचा कार्यक्रम घेऊन पक्षीसप्ताह साजरा केला. यासोबतच परभणी जिल्ह्यामध्ये श्री. अनिल उरटवाड यांच्या मार्गदर्शनात अस्ट्रॉनॉमिकल सोसायटी परभणी व शब्दसहयाद्री जिंतूर यांच्या सहकार्याने निवळी जलशयावर पक्षी निरीक्षण कार्यशाळा आणि ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, आणि मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी आणि पक्षीमित्रांनी उपस्थिती दर्शविली.

गोंदिया जिल्ह्यामध्ये गोंदिया वन विभाग, महाराष्ट्र पक्षीमित्र आणि स्थानिक गोंदिया निसर्ग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पांगडी जैवविविधता वन उद्यान येथे पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यासाठी पक्षीमित्र उत्साहाने सहभागी झाले. पुणे जिल्हा समन्वयक श्री. निखिल ढगे आणि इतर पक्षीमित्र व रहिवासी यांच्या सोबत स्थानीय पर्यावरणीय संस्था यांच्या सहकार्याने आणि पुणे वनविभागाच्या मदतीने वेताळ टेकडी पक्षीनिरीक्षण करून पक्षी सप्ताह साजरा केला. यासोबतच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यामध्येही पक्षीसप्ताह निमित्त पक्षी विषयक विविध कार्यक्रम घेण्यात आले.

राज्यभरात पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामधे महाराष्ट्र पक्षिमित्र आणि विविध संस्था, शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि वनविभाग यांनी संयुक्तपणे संपूर्ण राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पक्षी निरीक्षणाच्या नोंदी, डॉक्युमेंटशन ई-बर्ड या आतंरराष्ट्रीय वेबसाईटवर नोंदविल्या गेल्या. शाळा महाविद्यालयांमध्ये पक्षीनिरीक्षण आणि पक्षी ओळख, व्याख्याने, पक्षी या विषयवर विविध स्पर्धा, पक्षी छायाचित्र प्रदर्शनी अश्या कार्यक्रमांचा समावेश होता. यातुन पक्षी जागर करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन ते समारोप विविध कार्यक्रमाने करण्यात आले. या सर्व उपक्रमात सहभागी महाराष्ट्र पक्षिमित्रचे अनेक आजीवन सभासद, विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयक, वृत्तपत्र प्रतिनिधी व विविध संस्थाचे आयोजक, ज्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात अथक परिश्रम केले त्या सर्वांचे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे मनःपूर्वक धन्यवाद.



कखंब परिसरातील पक्षी छायाचित्र प्रदर्शनीचे उद्घाटन माननीय तहसीलदार श्री. धीरज स्थूल यांच्या हस्ते झाले. सोबत गटविकास अधिकारी श्री. सुभाष मानकर आणि मुख्याधिकारी कळंब नगर पंचायत श्री. अनुप अग्रवाल आणि महाराष्ट्र पक्षी मित्र जिल्हा समन्वयक डॉ. चेतना उगले

# स्वागत नविन सभासदांचे

## (दिनांक ०१ ऑक्टोबर मे ३१ डिसेंबर)

| Membership No. | Name of Member | Place/District |
|---|---|---|
| 1509 | Shri. Pravin Rambhau Konde | Amravati |
| 1510 | Shri. Mahesh Paithankar | Ahmadabad (Gujrat) |
| 1511 | Dr. Varsha Prasad Wadegaonkar | Amravati |
| 1512 | Shri. Dipak Shivaji Lad | Kolhapur |
| 1513 | Sau. Vidula Keadr Kulkarni | Pune |
| 1514 | Shri. Dipak Devidasji Ghodekar | Yavatmal |
| 1515 | Shri. Aashish Band Jain | Karanja Lad (Washim) |
| 1516 | Shri. Rahul Wadghule | Nashik |
| 1517 | Shri. Vikramsingh Prabhakar Ghatge | Kolhapur |
| 1518 | Dr. Shardul S. Dongawkar | Karanja Lad (Washim) |
| 1519 | Ku. Shivali Shashikant Prabhu | Pune |
| 1520 | Shri. Milind Khanzode | Amravati |
| 1521 | Shri. Kiran Ambaji Goriwale | Thane (west) |
| 1522 | Shri. Ghanshyam Rambhauji Bhadange | Katol (nagpur) |
| 1523 | Dr. Mohan Ramchandra Dharmadhikari | Kolhapur |
| 1524 | Shri. Diwakar B. Dalvi | Airoli (Navi Mumbai) |
| 1525 | Shri. Nitin Sahebrao Kitukale | Nerul (Navi Mumbai) |
| 1526 | Ratnaprabha Bhauso Naik | Kolhapur |
| 1527 | Shri. Prabhakar Hari Wagh | Dhule |
| 1528 | Shri. Chandramuni Maroti Walke | Jintur (Parbhani) |
| 1529 | Shri. Manik Pralhadbua Puri | Parbhani |
| 1530 | Shri. Pramod Nananji Ingole | Chandrapur |
| 1531 | Shri. Satish Shankarrao Kulkarni | Sangli |
| 1532 | Shri. Gaurav Prakash Diwan | Pune |
| 1533 | Shri. Sachin Sharad Kusnale | Miraj (belgavi) |
| 1534 | Shri. Saket Satish Doshi | Sangli |
| 1535 | Shri. Sachin Subhash Pawar | Ahemadnagar |
| 1536 | Shri. Subhash Jankiram Pare | Jalna |
| 1537 | Shri. Madhukar Bhimrao Gaikwad | Jalna |
| 1538 | Dr. Amit Tagare | Sangli |
| 1539 | Dr. Mugdha Tagare | Sangli |
| 1540 | Mr. Firoz Gulab Chaus | Nipani (Belgaon) |
| 1541 | Adv. Firoz Gulab Tamboli | Miraj (sangli) |
| 1542 | Shri. Sachin Dhanpal Ruikar | Sangli |
| 1543 | Sau. Priya Ramesh Gaikwad | Sangli |
| 1544 | Shri. Gajanan Vaijnath Paralikar | Sangli |
| 1545 | Shri. Arnav Amrendra Patwardhan | Dombivali (East) |
| 1546 | Shri. Nishant Nandkumar Bhagwat | Virar (west) |
| 1547 | Shri. Dipaksingh Mahendrasigh Thakur | Daund (pune) |
| 1548 | Nilima Ravi | Villeparle (East Mumbai) |
| 1549 | Bhagyashri Krishna Parab | Kudal (Sindhudurg) |
| 1550 | Dr. Sandip Gajanan Kshotri | Satara |
| 1551 | Shri. Viraj Hanumant Farande | Daund (Pune) |
| 1552 | Mrs. Charushila Shukla | Nashik |
| 1553 | Jyoti Patil | Nashik |
| 1554 | Shri. Ajit Sambhaji Patil | Kolhapur |
| 1555 | Shri. Milind Pandurang Babar | Sangli |
| 1556 | Shri. Subhash Shivajirao Ghule | Pune |
| 1557 | Ku. Kajal Bharat Patil | Solapur |
| 1558 | Shri. Suhas Jinnapa Lande | Sangli |
| 1559 | Dr. Nandini Pandurang Patil | Sangli |
| 1560 | Shri. Shashikant Dattatray Awalkar | Kolhapur |
| 1561 | Shri. Pradeep Suryakant Soshte | Panvel (Raigadh) |
| 1562 | Shri. Prakash Goray | Thane |
| 1563 | Dr. Vidya Sunil Patil | Kolhapur |
| 1564 | Shri. Mohit Sanjiv Bobade | Ner Parsopant (Yavatmal) |

# टपाल तिकिटांच्या दुनियेत मॉरिशस खरूची
## Mauritius Kestrel



रवींद्र वामनाचार्य
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

मॉरिशस केस्ट्रेल हा ससाणा कुळातील शिकारी पक्षी मॉरिशसच्या जंगलामध्ये आढळणारा स्थानिक पक्षी आहे, जो फक्त दक्षिण पूर्वेचा पठारी भाग, जंगले, डोंगरकडे, दऱ्यांमध्ये वास्तव्य करतो. नर व मादी दोघेही सारखेच असतात. फक्त नर थोडा लहान दिसतो. याचा आकार २६ ते ३०.५ सें.मी. इतका असतो तर वजन साधारण २०० ग्रॅम इतके असते. याचा पंखपसारा ४५ सें.मी. एवढा असतो. याचे पंख सापेक्षरीत्या आखूड असतात. तसेच लांब शेपूट, लांब पाय व आखूड पंजा असतो. या पक्ष्याच्या शरीराचा वरील भाग तपकिरी रंगाचा व त्यावर काळ्या रेघा असतात व खालचा भाग पांढऱ्या रंगाचा असतो व त्यावर गडद ठिपके असतात. हा पक्षी मांसाहारी असल्याने जंगलामध्ये हवेत उडत आपले भक्ष्य पकडतो. मुख्यत्वे हा लहान सरडे, पतंग, सिकाडा, रातकिडे, झुरळे व छोटे पक्षी भक्षण करतो. या पक्ष्याचे आयुष्यमान १५ वर्षांचे असते.

१९७४ च्या सुमारास मॉरिशस केस्ट्रेल हा पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर होता. एका मादीसहित फक्त चारच पक्षी अस्तित्वात होते. परंतु सातत्यपूर्ण संवर्धन व संरक्षणाच्या प्रयत्नांमुळे २०१९ साली या पक्ष्याची संख्या ४०० पर्यंत पोहोचली. ही पक्षी संवर्धनाची कामगिरी, जगातील पुनरुज्जीवन प्रकल्पातील यशस्वी व उत्तमरीत्या नोंदीकृत केलेली अशी अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणून गणली गेली आहे. म्हणूनच मार्च २०२२ मध्ये मॉरिशस गणराज्याच्या ३० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मॉरिशस केस्ट्रेल पक्ष्याला राष्ट्रीय पक्षी म्हणून सन्मानित केले जाते.

मॉरिशस व भारत सरकारच्या राजनैतिक संबंधांच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त भारतीय टपाल खात्यातर्फे दि. २ नोव्हेंबर २०२३ रोजी भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर व मॉरिशसचा राष्ट्रीय पक्षी मॉरिशस केस्ट्रेलचे चित्र असलेले २५ रुपयाचे टपाल तिकीट जारी केले गेले आहे.





**Birds & Mammals**

**Sculpture**




**Bird Calls**

**CDS**



**Singing Bird**

**Clock**

# Wildlifekart.com

## Online Shop for Nature and Wildlife Lovers

wildlifekart@gmail.com 7400488996

- 1,000 + Birds and Wildlife related products
- 100 + Products categories
- Information of various Wildlife Resorts across India, Wildlife Tours and Wildlife News




**Birds & Wiildlife**

**Tshirts**



**Birds and Mammals**

**Lapel Pins**



**Beautiful**

**Bird Nests**

# CIBA

Central India Bird Academy

## OUR MISSION

To encourage interest in birds and promote conservation of birds' habitats through research, education and awareness.

## WE FOCUS ON

- Avian Ecology
- Conservation Ecology
- Ethno-Ornithology
- Applied Ornithology
- Nature Education

## Proposed Activities and Projects

- To conduct Lectures, talks, thematic workshop and seminars on birds.
- To identify status of birds and their habitats in urban landscape.
- To award fellowships to field Ornithologists / Researchers

- **For More Details Contact :**


**The Director**

Central India Bird Academy (CIBA)

Q-12, Siddhivinayak Apartments, Near Jain Mandir, Laxminagar

Nagpur-440022 Maharashtra (india)

Email : ciba.nagpur@gmail.com

**0721-2223022**

**9881713466, 9922964316, 9421189333**




# भावपूर्ण श्रद्धांजली
## कै. अजित उर्फ पापा पाटील सांगली



सांगली येथील ३६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्ष तथा सांगली जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक अजित उर्फ पापा पाटील यांचे दि. ३ जानेवारी २०२४ रोजी दुखद निधन झाले. महाराष्ट्र पक्षिमित्रचे ते जेष्ठ सभासद होते. सांगली जिल्ह्यातील वन्यजीव संवर्धनासाठी त्यांनी अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न केलेत. नुकतेच घोषित झालेले आटपाडी संवर्धन राखीव क्षेत्रास संवर्धनाचा दर्जा मिळावा यासाठी त्यांचे महत्वाचे योगदान होते, तसेच चांदोली व्याघ्र प्रकल्पात त्यांची महत्वाची भूमिका होती. कराड येथील ३३ व्या संमेलनाचे आयोजनात सुद्धा त्यांची महत्वपूर्ण भूमिका होती. सांगली येथील संमेलन पार पडल्यानंतर अवघ्या १० दिवसांत त्यांच्या निधनाची बातमी कळली. पर्यावरण व वन्यजीवांसाठी तळमळीने कार्य करणाऱ्या एका कार्यकर्त्याचे असे तडकाफडकी निघून जाने मनाला चटका लावून गेले. त्यांच्या जाण्याने या क्षेत्राची मोठी हानी झाली यात शंका नाही. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो हीच प्रार्थना. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पापा पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

*****

### माहितीचा उजाळा उत्तरे

१. वारकरी
२. Zapornia parva
३. वेक बेटाची' टाकडी
४. Rallidae
५. बॅरी टेलर
६. पांढऱ्या भुवयाची' टाकडी P. cinereus
७. रापा बेट
८. १८ (IB ७.२ आवृत्ती)
९. वारकरी
१०. बॅरी टेलर

Book Post

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षिमित्र
६३, अरण्यार्पण समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org
Mob.+91 7030101981

पक्षिमित्र
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन